

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०६ | अंक : ८२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.०४ नोव्हेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

महायुतीमध्ये वादाची मोठी ठिणगी, मंत्री सरनाईक यांचे भाजप आमदारावर गंभीर आरोप

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.०३, सोलापूर : मीरा-भाईंदरम ध्ये भाजप आणि शिवसेनेत किती टोकाचा वाद आहे हे आता स्पष्टपणे समोर आलं आहे. शिवसेनेचे नेते तथा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सोलापूर दौऱ्यावर असताना मीरा-भाईंदरचे भाजप आमदार नरेंद्र मेहता यांच्यावर सडकून टीका केली. त्यांनी केवळ टीका केली नाही तर गंभीर स्वरुपाचे आरोप केले आहेत. भाजप आणि आम्ही एकीकडे लोकशाही बचाव रॅली काढत आहोत. पण म ीरा-भाईंदरमध्ये लोकशाही पायदडी तुडवली जात आहे, असा घणाघात प्रताप सरनाईक यांनी केला.

मीरा-भाईंदर हे भारतीय जनता पक्ष नाही. महापालिका क्षेत्रातमध्ये सेव्हन-इलेव्हन नावाची कंपनी आहे, त्या कंपनीचा मालक दरोडेखोर आहे. बकासूर आहे. म्हणजे दिवाळीच्या तोंडावर त्याला भस्मासूर सुद्धा म्हणता येईल. त्याचं दहन लवकरच जसं सर्वसामान्य जनता २०१९ ला झालं आहे, तशाच पद्धतीचं दहन जनता पुढच्या निवडणुकीत करेल, असा घणाघात प्रताप सरनाईक यांनी केला.

सरनाईकांचे मेहतांवर गंभीर आरोप

ज्या पद्धतीने मीरा-भाईंदरम ध्ये भ्रष्टाचार सुरु आहे, जसे की आदिवासींच्या जमिनी हडपणं, भूम िपुत्रांच्या जमिनीवर बळजबरने ताबा घेणं, त्यांचे घर नेस्तनाबूत करणं, सामान्य पत्रकारांना मारणं, नागरिकांना मारणं, गुंड प्रवृत्तीच्या लोकांना प्रवेश घेणं, बलात्कार आणि पोस्को सारखे गुन्हे ज्यांच्यावर आहेत, असे जवळपास ३० टक्के नगरसेवक हे सेव्हन इलेव्हन कंपनीच्या नरेंद्र मेहता यांचे आहेत, असा आरोप प्रताप सरनाईक यांनी केला.





लोकशाही पायदडी तुडवली जात असल्याचा आरोप...

मला कळत नाही की, देश पातळीवर लोकशाहीचा बचाव करणारा भाजप पक्ष महाराष्ट्रात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आम्ही सर्वजण लोकशाहीचा बचाव करण्यासाठी आम्ही रॅली काढतोय. अशा पद्धतीत मीरा-भाईंदरमध्ये मात्र लोकशाही पायदडी तुडवली जात आहे. दुर्दैवी आहे. भाजपने लक्ष घातलं पाहिजे, असं प्रताप सरनाईक म्हणाले.

भाजप हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विचारांवर चालणारा पक्ष आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विचारांवर चालणारा पक्ष आहे. पण त्या पक्षाचे स्थानिक नेते अशाप्रकारचे गैरकृत्य करत असतील, पोलिसांच्या नाकावर टिच्चून अशी कारवाई करत असतील, गुन्हेगारी प्रवृत्ती त्या शहरात वाढत असेल तर ते त्या शहराचं दुर्दैव आहे, अशी शब्दांत सरनाईकांनी निशाणा साधला.

'आमदारांवर २१ गुन्हे'

मी २० वर्षे त्या शहराचं प्रतिनिधी म्हणून काम करताना असं कधी घडलं नाही. किंवा प्रताप सरनाईकवर एक एनसी किंवा तक्रार गेली नाही. पण निवडून आलेल्या आमदारांच्या विरोधात तब्बल २१ गुक्हे दाखल आहेत.

तेही बलात्कारासारखे गंभीर गुन्हे, जमीन हडप करण्यासारखे गंभीर गुन्हे आहेत. त्यामुळे भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी याकडे लक्ष घालणं गरजेचं आहे, असं सरनाईक म्हणाले.

'महसूलमंत्र्यांनी भाजप आमदारांवरील आरोप मान्य केले'

आरोप करणं वगैरे कठीण नाही. पण दाखवावं ना, प्रताप सरनाईकने एक इंच जमीन हडप केली. तुम च्याच पक्षाचे महसूल मंत्री सभागृहात सांगतात की सेव्हन इलेव्हन कंपनीचे म ालक नरेंद्र मेहता यांनी आदिवासींच्या जमिनी हडप केल्या. त्यामुळे आरोप करणं फार कठीण नाही. पण आरोप सिद्ध करणं फार मोठी गोष्ट आहे. आम्ही जे आरोप केले आहेत ते सिद्ध करुन दाखवलं आहे आणि तुमच्याच पक्षाचे नेते असलेले महसूलमंत्र्यांनी ते मान्य केलेलं आहे. याची गंभीर दखल भाजप घेईल, असा दावा प्रताप सरनाईक यांनी केला.

पारनेरमध्ये लंकेंचा दणदणीत विजय !

जिल्हा बँकेच्या राजकारणात निलेश लंके यांची दमदार एंट्री

अक्षराज : वसंत रांधवण

दि.०३, अहिल्यानगर : अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत पारनेरच्या प्रतिष्ठेच्या लढतीत खासदार निलेश लंके यांनी दणदणीत विजय मिळवत विरोधकांना जोरदार धक्का दिला आहे. विविध कार्यकारी सेवा सोसायटी मतदारसंघातून लंके यांनी एकूण १०४ मतदानांपैकी ६४ मते मिळवत विजयावर शिक्कामोर्तब केले.

त्यांचे प्रतिस्पर्धी आणि विखे समर्थक मानले जाणारे भाजपचे राहुल शिंदे यांना पराभवाचा सामना करावा लागला. या निकालाने जिल्हा बँकेच्या राजकारणात लंके यांनी दमदार प्रवेश केला असून विखे गटासाठी हा मोठा राजकीय धक्का मानला जात आहे.अहिल्यानगर जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या मतमोजणीला मंगळवारी सकाळी नऊ वाजता सुरुवात झाली. जिल्ह्यातील दहा जागांसाठी सोम वारी मतदान प्रक्रिया पार पडली होती.



पारनेरची लढत बनली होती विशेष प्रतिष्ठेची !

यापूर्वीच अकरा जागा बिनविरोध झाल्याने उर्वरित दहा जागांच्या निकालाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले होते. त्यातही पारनेर मतदारसंघातील लढत विशेष प्रतिष्ठेची बनली होती. या लढतीत खासदार लंके आणि भाजपचे राहुल शिंदे आमनेसामने होते. दोन्ही बाजूंनी विजयासाठी जोरदार मोर्चेबांधणी करण्यात आली होती. मात्र, मतम ोजणीचा निकाल जाहीर होताच लंके यांनी बाजी मारली. ६४ मतांचा कौल मि ळवत त्यांनी प्रतिस्पर्ध्याला पराभूत केले. जिल्हा बँके ही शेतकऱ्यांची कामधेनू मानली जाते. या बँकेच्या सत्ताकारणात प्रवेश मिळवण्यासाठी जिल्ह्यातील म ातब्बर नेत्यांनी प्रतिष्ठा पणाला लावली होती. अशा परिस्थितीत पारनेर मधून मि ळालेला लंके यांचा विजय केवळ एका जागेपुरता मर्यादित नसून जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील राजकीय समीकरणांना नवे वळण देणारा ठरणार आहे. विखे समर्थक उमेदवाराचा पराभव आणि लंके यांचा विजय यामुळे जिल्हा बँकेच्या राजकारणात आता कोणाचे पारडे जड ठरणार, याची उत्सुकता वाढली आहे.

महाराष्ट्राच्या राजकिय पटलावर खा.लंकेंचा शिक्का!



अक्षराज : राजकुमार इकडे

दि.०३, सुपा (अहील्यानगर) : विखे-थोरात यांची राजकीय सम ीकरणे, राहुल शिंदे यांना मिळालेले पाठबळ आणि त्यासमोर खासदार नीलेश लंके यांनी मिळवलेला विजय, एक मंत्री, दोन माजी खासदार, आठ आजी-माजी आमदार... **तरीही खासदार निलेश लंके यांची बाजी!**

विखे-थोरातांच्या राजकीय एकजुटीला पारनेरमध्ये धक्का; मोठ्या राजकीय ताकदीसमोर लंके यांचा विजय

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पारनेर विविध कार्यकारी सेवा सोसायटी मतदारसंघातील निवडणुकीत खासदार नीलेश लंके यांनी दणदणीत विजय मिळवला. एकूण १०४ मतांपैकी लंके यांना ६४ मते मिळाली, तर राहुल शिंदे यांना ४० मते मिळाली. लंके यांनी २४ मतांनी विजय मिळवला.

या निवडणुकीची खरी राजकीय पार्श्वभूमी पाहता, एका बाजूला मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, दोन खासदार आणि आठ आजी-माजी आमदारांची ताकद होती. विखे-थोरात यांची राजकीय हातमिळवणी आणि राहुल शिंदे यांना मिळालेले पाठबळ यामुळे ही निवडणूक प्रतिष्ठेची बनली होती.

मात्र एवढ्या मोठ्या राजकीय शक्तीसमोर खासदार नीलेश लंके यांनी विजय मिळवत विरोधकांच्या राजकीय गणिताला धक्का दिला. राजकीय समीकरणे जुळवताना दुखावले गेलेले घटक अखेर लंके यांच्या नेतृत्वाकडे वळले का, अशी चर्चा आता सुरू झाली आहे. नेत्यांची ताकद मोठी असली तरी मतदारांचा कौल त्याहून मोठा असतो, हेच पारनेरच्या निकालाने दाखवून दिले.

प्रतिजैविक औषधांचा अनावश्यक वापर रोखण्यासाठी फार्मासिस्टनी पुढाकार घ्यावा : प्रतापराव जाधव

अक्षराज : प्रतिनिधी

दि.०३, छ.संभाजीनगर : प्रतिजैविक औषधांचा अनावश्यक व अयोग्य वापर हे सार्वजनिक आरोग्यासमोरील गंभीर आव्हान आहे. या औषधांचा डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय वापर टाळण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे. औषधांचा योग्य व सुरक्षित वापर सुनिश्चित करण्यासाठी फाम ासिस्टनी सक्रिय भूमिका घ्यावी.

प्रत्येक फार्मसी हे रुग्णांना औषधविषयक योग्य माहिती व मार्गदर्शन देणारे विश्वासार्ह केंद्र बनले पाहिजे, असे प्रतिपादन केंद्रीय आयुष राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) तथा आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज येथे केले. भारतीय फार्मसी परिषद, एम जीएम विद्यापीठाचा औषधनिर्माणशास्त्र विभाग आणि वाय. बी. चव्हाण कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक फार्मासिस्ट दिन व राष्ट्रीय फार्मसी सप्ताह २०२६ निमित्त एमजीएम रुग्णालयातील रुक्मिणी सभागृहात राज्यस्तरीय सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी भारतीय फार्मसी परिषदेचे अध्यक्ष डॉ. माँटू कुमार पटेल, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, हिंदुस्थान अँटीबायोटिक्सचे माजी व्यवस्थापकीय संचालक डॉ. यशवंत घारपुरे, वॉकहार्ट रिसर्च सेंटरचे मुख्य वैज्ञानिक अधिकारी डॉ. सचिन भागवत यांच्यासह म ान्यवर उपस्थित होते.केंद्रीय राज्यमंत्री जाधव म्हणाले की, प्रतिजैविक प्रतिकार अर्थात अँटी-मायक्रोबियल रेझिस्टन्स ही समस्या केवळ एका रुग्णापुरती मर्यादित नसून संपूर्ण समाजाच्या आरोग्याशी संबंधित आहे. प्रतिजैविक औषधांचा अनावश्यक वापर, डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधे घेणे, स्वतः हून उपचारपद्धती बदलणे किंवा निर्धारित उपचार अपूर्ण ठेवणे यामुळे सूक्ष्मजीवांमध्ये औषधांप्रती प्रतिकारक्षमता निर्माण होते. परिणामी सामान्य संसर्गावर उपचार करणेही कठीण होऊ शकते. त्यामुळे औषधांचा वापर वैद्यकीय सल्ल्यानुसारच होणे आवश्यक आहे.

आरोग्य व्यवस्थेत फार्मासिस्ट हा रुग्ण आणि आरोग्यसेवा यांच्यातील महत्त्वाचा दुवा आहे. औषधांची गुणवत्ता, योग्य मात्रा, वापरण्याची पद्धत, उपचाराचा कालावधी आणि संभाव्य दुष्परिणाम याबाबत रुग्णांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी फार्मासिस्टनी पार पाडावी. डॉक्टरांच्या सूचनेनुसार उपचार पूर्ण करणे, स्वतःहून औषधे बंद न करणे आणि



उरलेली औषधे इतरांना न देणे याबाबतही जनजागृती करावी. प्रतिजैविक प्रतिकाराच्या समस्येवर मात करण्यासाठी शासन, भारतीय फार्मसी परिषद, शैक्षणिक संस्था, औषधनिर्मिती उद्योग आणि वैद्यकीय क्षेत्राने समन्वयाने काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.आयुर्वे द, योग, निसर्गोपचार, युनानी, सिद्ध आणि होमिओपॅथी या आयुष उपचारपद्धती आरोग्य संवर्धन आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेत योगदान देत आहेत. पारंपरिक आरोग्यविषयक ज्ञानाचा आधुनिक विज्ञानाच्या आधारे अभ्यास करताना औषधांची गुणवत्ता, सुरक्षितता आणि परिणामकारकतेच्या संशोधनाधारित मूल्यम पनाला प्राधान्य दिले पाहिजे.

आधुनिक वैद्यक आणि आयुष उपचारपद्धतींमध्ये समन्वय साधताना वैज्ञानिक पुरावे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. डिजिटल आरोग्य, कृत्रिम बुद्धिमत्ता, जैवतंत्रज्ञान आणि औषध संशोधनामुळे फार्मसी क्षेत्रात नवीन संधी उपलब्ध होत आहेत. या बदलांनुसार अभ्यासक्रम, प्रशिक्षण आणि संशोधनाला चालना देणे आवश्यक आहे. भारतीय फार्मसी परिषद आणि शैक्षणिक संस्थांनी औषध सुरक्षा, रुग्ण मार्गदर्शन व प्रतिजैविक प्रतिकार प्रतिबंधावर अधिक भर द्यावा. विद्यार्थ्यांनी आपले ज्ञान, कौशल्य आणि संशोधनाचा उपयोग सामान्य नागरिकांच्या आरोग्यसेवेसाठी करावा. औषधांचा जबाबदारीने वापर ही केवळ नियमांची बाब नसून भावी पिढ्यांच्या आरोग्याशी संबंधित सामूहिक जबाबदारी आहे. सर्वांनी मिळून 'स्वस्थ भारत, समर्थ महाराष्ट्र' घडविण्याचा संकल्प करावा, असे आवाहनही केंद्रीय राज्यमंत्री जाधव यांनी केले.फार्मसी शिक्षणात आधुनिक तंत्रज्ञान व औद्योगिक प्रशिक्षणावर भर – डॉ. माँटू कुमार पटेलभारतीय फार्मसी परिषदेचे अध्यक्ष डॉ. माँटू कुमार पटेल यांनी सांगितले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार बी. फार्मा अभ्यासक्रम ात क्लिनिकल फार्मसी, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आधुनिक तंत्रज्ञानावर भर देण्यात आला आहे.

फार्मसी शिक्षण आणि औषध उद्योग यांच्यातील समन्वय वाढविण्यासाठी इंडस्ट्री-अॅकॅडेमिया अॅडव्हायझरी बोर्ड स्थापन करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांसाठी रोजगार मेळावे, औद्योगिक प्रशिक्षण आणि संशोधनाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी परिषद प्रयत्नशील आहे. एम. फार्मा विद्यार्थ्यांच्या जीपॅट शिष्यवृत्तीसाठी २०० कोटी रुपये आणि संशोधन व कौशल्य केंद्रांसाठी ८० कोटी रुपयांच्या तरतुदीची माहिती त्यांनी दिली.

औषधांचा सुरक्षित वापर आणि प्रतिजैविक प्रतिकार रोखण्यासाठी फार्मासिस्टनी रुग्णांना मार्गदर्शन करण्याचे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमास भारतीय फार्मसी परिषदेचे सदस्य डॉ. श्रीकांत जोशी, प्रकाश वंजारी, डॉ. संजय तोष्णीवाल, एमजीएम विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, डॉ. एम. एच. देहगन, डॉ. हेमंत जैन, डॉ. स्वरूप लाहोटी यांच्यासह विविध फार्मसी संस्थांचे प्राचार्य, प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थी उपस्थित होते.यावेळी भारतीय फार्मसी परिषदेच्या वृत्तपत्रिकेचे अनावरण करण्यात आले.

डॉ. विलास सपकाळ व डॉ. संजय तोष्णीवाल यांनी मनोगत व्यक्त केले. प्रतिजैविक प्रतिकार प्रतिबंधाबाबत जनजागृती करण्यासाठी विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांत सहभाग घेतला.



इस्रोच्या यशस्वी कामगिरीमुळे भारताच्या अंतराळ सामर्थ्यात भर!



भारताने विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सातत्याने प्रगती करत जगात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. विशेषतः अंतराळ संशोधनाच्या क्षेत्रात भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रोने केलेली कामगिरी अभिमानास्पद आहे. अत्यंत मर्यादित साधनसामग्रीतून सुरुवात करणाऱ्या इस्रोने आज जागतिक अंतराळ संशोधन क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे. नुकतेच जीएसएलव्ही-एफ १८ या प्रक्षेपकाद्वारे 'एनव्हीएस-०३' या उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण करून इस्रोने आपल्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे. या यशाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इस्रोच्या शास्त्रज्ञांचे अभिनंदन केले आहे.

'एनव्हीएस-०३' हा भारताच्या स्वतंत्र नेव्हिगेशन सॅटेलाइट सिस्टीम अर्थात 'नाविक' प्रणालीतील तिसरा उपग्रह आहे. या उपग्रहामुळे भारताची स्वदेशी दिशादर्शक प्रणाली अधिक सक्षम आणि विश्वासार्ह होण्यास मदत होणार आहे. सध्या मोबाईल, वाहतूक व्यवस्था, जहाजे, विमाने तसेच संरक्षण क्षेत्रात दिशादर्शन प्रणालीला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. अशा परिस्थितीत भारताची स्वतःची उपग्रहाधारित दिशादर्शक प्रणाली असणे ही काळाची गरज आहे. 'एनव्हीएस-०३'च्या यशस्वी प्रक्षेपणामुळे ही प्रणाली अधिक बळकट होणार आहे. विशेष म्हणजे, या उपग्रहामध्ये स्वदेशी बनावटीच्या अणुघड्याळांचाही वापर करण्यात आला आहे. त्यामुळे वेळेची अचूकता आणि स्थान निश्चिती अधिक प्रभावी होण्यास मदत होईल.

या उपग्रहाचे महत्त्व केवळ वैज्ञानिक प्रगतीपुरते मर्यादित नाही. देशाच्या राष्ट्रीय सुरक्षा आणि सामरिक सामर्थ्याच्या दृष्टीनेही ही मोठी उपलब्धी आहे. सीमावर्ती भागांतील हालचालींवर लक्ष ठेवणे, लष्करी मोहिमांचे नियोजन करणे, आपत्ती व्यवस्थापन, समुद्री वाहतूक आणि हवामानविषयक माहिती मिळवणे अशा अनेक क्षेत्रांत या प्रणालीचा उपयोग होऊ शकतो. परदेशी दिशादर्शक प्रणालींवरील अवलंबित्व कमी करून भारताला स्वयंपूर्ण बनवण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल आहे.

इस्रोने यापूर्वी चांद्रयान, मंगळयान, आदित्य एल-१ आणि विविध उपग्रह मोहिमांच्या माध्यमातून आपले सामर्थ्य सिद्ध केले आहे. अत्यंत कमी खर्चात जागतिक दर्जाच्या अंतराळ मोहिमा राबविण्याची क्षमता भारताने जगाला दाखवून दिली आहे. भारतीय शास्त्रज्ञांची बुद्धिमत्ता, संशोधनवृत्ती, जिद्द आणि अथक परिश्रम यामुळेच हे यश शक्य झाले आहे. मात्र, अंतराळ संशोधनातील ही प्रगती अधिक व्यापक करण्यासाठी संशोधनावर होणारी गुंतवणूक वाढविणे, नव्या पिढीला विज्ञानाकडे आकर्षित करणे आणि तरुण संशोधकांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. खासगी क्षेत्रालाही या क्षेत्रात अधिक संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

एकंदरीत, 'एनव्हीएस-०३'चे यशस्वी प्रक्षेपण ही भारताच्या वैज्ञानिक प्रगतीतील महत्त्वपूर्ण घटना आहे. भारत केवळ अंतराळ तंत्रज्ञानाचा वापर करणारा देश राहिलेला नसून स्वतःचे तंत्रज्ञान विकसित करून जगाला दिशा देण्याची क्षमता असलेला देश बनत आहे. इस्रोच्या या यशामुळे प्रत्येक भारतीयाची मान अभिमानाने उंचावली आहे. भारतीय शास्त्रज्ञांच्या कर्तृत्वाला आणि त्यांच्या अथक परिश्रमांना मनापासून सलाम!

- श्याम ठाणेदार

अन्यायी ब्रिटिशांविरुद्ध बंड पुकारणारे आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके !



वासुदेव बळवंत फाडके यांचा जन्म शिरढोण येथे ४ नोव्हेंबर १८४५ या दिवशी झाला. त्यांचे आजोबा अनंतराव हे स्वराज्यात जवळच्या कर्नाळा किल्लूयाचे किल्लेदार होते. १८१८ मध्ये इंग्रजांनी तो त्यांना रिकामा करून देण्यास सांगितले. ते नाकारून त्यांनी इंग्रजांशी सतत तीन दिवस लढाई लढली. अशा आजोबांच्या स्वातंत्र्य प्रीतीचा वारसा घेऊन वासुदेव जन्माला आले. वैभवात जन्मलेले वासुदेव गोर्यापान वर्णाचे, सरळ नाकाचे आणि पाणीदार निळसर डोळ्यांचे आणि सुदृढ शरीरयष्टी असलेला खंदे वीर होते. शिक्षणानंतर मुंबईत जी.आर.पी. रेल्वेत ग्रँट मेडीकल महाविद्यालयात वासुदेवांनी काही काळ नोकरी केली; पण वरिष्ठांशी खटका उडाल्याने त्यांना ती नोकरी सोडली आणि मिलीटरी फायनान्स ऑफीसमध्ये नोकरी धरली. १८६५ या वर्षी त्यांची पुण्याला बदली झाली. वासुदेवांना त्यावेळी ६० रुपये मासिक वेतन होते आणि त्यांच्या कामावर वरिष्ठ इंग्रज अधिकारीही खूष असत. सैनिकी विभागाशी संबंध असल्यामुळे ब्रिटिशांच्या सैन्य व्यवस्थेची बरीचशी माहिती त्यांना आपोआपच मिळाली.

१८७० मध्ये वासुदेवांना आई अत्यवस्थ असल्याचे वृत्त शिरढोणहून कळले. तिला भेटण्यासाठी त्यांनी कार्यालयातून सुट्टी मागितली; पण ती त्यांना मिळाली नाही. उलट अपशब्द ऐकावे लागले. वासुदेव तसेच आईच्या भेटीला निघून गेले; मात्र ते तिथे पोहोचण्याआधीच आई मृत्यू पावली होती. आपल्या आईची शेवटची भेट होऊ न देणारा इंग्रज अधिकारी आणि एकंदर इंग्रज यांच्याविरुद्ध त्यांचे मन फार प्रक्षुब्ध झाले. १८७१ या वर्षी पुण्यात काकांनी सार्वजनिक सभेद्वारे जनतेची गार्हाणी दूर करण्यासाठी आघाडी उघडली. वासुदेवांनी त्यांच्या या कार्यात भाग घेतला. १८७३ मध्ये काकांनी खादी वापरण्याचे व्रत घेतले, तेव्हा वासुदेवांनीही फक्त स्वदेशी वस्तू वापरण्याची शपथ घेतली आणि ती आजन्म पाळली. वासुदेव बळवंत फडके सुट्टीच्या दिवशी जवळच्या खेड्यापाड्यात जाऊन स्वदेश आणि स्वातंत्र्य यांवर व्याख्याने देत फिरू लागले. गरीब जनतेची दुःखे जवळून पाहू लागले. 'इंग्रजी राज्यामुळेच तुमची ही अशी दैना आहे', असे ते शेतकर्यांना सांगू लागले. त्यांनी पुण्यात तरुणांसाठी तलवार आणि दांडपट्टा चालवण्याचा अन् मल्लविद्या शिकवण्याचा वर्ग काढला. तो गुप्तपणे रात्री किंवा पहाटे नरसोबाच्या देवळापलीकडे निवांत जागेत चाले. त्यात शे-दीडशे तरुण येत. त्यात शरीर कमवण्यासाठी एक वर्ष अभ्यासाला रजा देणारे लो. बाळ गंगाधर टिळक हेही होते. या तरुणांतून तावून सुलाखून निघालेल्या निवडक तरुणांची त्यांनी एक गुप्त संघटना स्थापन केली. प्रभात फेर्यांमधून, शाळा महाविद्यालयांनी दिलेल्या भेटींतून आणि भक्तीपर कार्यक्रमांतून ते आणि त्यांचे सहकारी आपल्या कार्याचा प्रचार करीत. दसर्याला रास्त्यांच्या वाड्यात शस्त्रपूजनाचा मोठा समारंभ होई. त्या वेळी दही-पोह्यांचा द्रोण हातात घेऊन स्वातंत्र्यासाठी सर्वस्व अर्पण करण्याची प्रतिज्ञा हे सभासद घेत. इंग्रजांचे हे राज्य उलथून स्वातंत्र्य मिळवल्याखेरीज देशाचे भले होणार नाही, अशी त्यांची खात्री झाली आणि त्यांच्या मनात बंडाचे विचार चालू झाले. ते आत्मवृत्तात म्हणतात, 'ज्या भूमीच्या पोटी आपण जन्मलो, तिच्याच पोटी ही सारी लेकरे झाली, त्यांनी अन्नावाचून उपाशी मरावे आणि आपण कुत्र्याप्रमाणे पोट भरीत रहावे, हे मला पहावले नाही आणि म्हणून मी ब्रिटीश सरकारविरुद्ध बंड पुकारले.'

ही वेळ राजकीय बंडाची म्हणजे दरोडे घालून राज्यसत्तेला आव्हान देण्याचीच होती. १८७९ च्या फेब्रुवारीत शिवरात्रीच्या मुहुर्तावर रामोशी, मांग इत्यादी लोक आणि काही पांढरपेशे लोक अशा दोन-तीनशे लोकांच्या सेनेसह त्यांनी थामारी गावावर पहिला दरोडा घातला. त्यानंतर त्यांनी घातलेल्या एका मागून एक अशा अनेक दरोड्यांमुळे इंग्रज सरकार चक्रावून गेले. नंतर जून १८७९ मध्ये ते गाणगापुरात परतले. नजीकच रहाणार्या रोहिल्यांशी ५०० घोडेस्वारांची नवी सेना उभारण्याचा त्यांनी करार केला आणि पैसे आणण्यासाठी ते पंढरपुरात निघाले. तेव्हा त्यांना पकडण्यासाठी १५०० हिंदी आणि गोरे सैनिक मेजर डॅनिअलच्या हाताखाली सतत खपत होते. हेरांकडून डॅनिअलला त्यांचा सुगावा लागला. सतत ४२ तासांच्या पाठलागानंतर त्यांना देवरनावडगी येथे २० जुलैच्या मध्यरात्री निद्रिस्त असता अटक करण्यात आली. पकडल्यानंतरही डॅनिअलला द्वंद्वयुद्धाचे आव्हान त्यांनी दिले; पण त्याने ते स्वीकारले नाही. त्यांच्या बंडाच्या माहितीसाठी त्यांचा अतोनात छळ करण्यात आला. पुण्याच्या सत्र न्यायालयात त्यांच्यासह १६ जणांवर राणी सरकार विरुद्ध सशस्त्र बंड पुकारण्याचा, कट केल्याचा, त्यासाठी माणसे आणि शस्त्रे गोळा केल्याचा, सरकारविरुद्ध राजद्रोह पसरविण्याचा आणि दरोडे घालण्याचा असे आरोप ठेवण्यात आले. त्यांच्या स्वप्नाला आणि ध्येयाला पेलेल असा प्रतिसाद न मिळाल्यामुळे या आद्यक्रांतीकारकाच्या नशिबी जन्मठेप, काळेपाणी, एडनचा कारागृह, तेथे तेलाचा घाणा चालवणे, चक्की पिसणे असे भोग आले. त्यांचे तेथे हालहाल करण्यात आले, तेव्हा दीड वर्षातच म्हणजे १२ ऑक्टोंबर १८८० या दिवशी मध्यरात्री त्यांनी आपल्या बेड्या तोडून, कोठडीची जड दारे उखडून, कारागृह फोडून पलायन केले. ते बारा मैल तसेच पळत होते. दुसर्या दिवशी बरेच पोलीस आणि सोजीर त्यांच्या पाठलागावर निघाले आणि दुपारी ३ वाजता त्यांना वीर आनंद या ठिकाणी पकडून परत कारागृहात आणले. मग जडातील जड बेड्या, एकाकी कोठडी आणि छळ चालू झाला. त्यांचे भीमकाय शरीर खंगत गेले. क्षयाने ते जर्जर झाले आणि वयाच्या केवळ अडतिसाव्या वर्षी १७ फेब्रुवारी १८८३ या दिवशी सायंकाळी ४.२० वाजता त्यांनी देह ठेवला. मातृभूमीला पारतंत्र्याच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी क्रांतीच्या असंख्य ज्वाला पेटवून हा वीर क्रांतिकारक अंतर्धान पावला ! अशा या क्रांतीपुरूषाच्या जयंतीदिनी त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन !

जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई
संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०

ऋणसेवा

कधीतरी जमेलं ती
करावी रे ऋणसेवा
जपा तपा पेक्षा हेचं

प्रियतम असते देवा
निरपेक्ष जेवढा भाव
पुण्य तसे जमे नावा
धावेलं देव संकटात

न करता मुळी धावा
सहस्त्रनाम स्मरणाचे
समाधान लाभे जिवा
मानवतेची तेल वात
उजळे अंतरात दिवा

पुण्यवान मानवअसा
पुण्यांलाही वाटे हेवा
दुर्मिळ खजिना जणूं
अति अलौकिक ठेवा

ऋण शुध्दीमध्ये नसे
तरी सुद्धा देईलं दुवा
अदृश्य अद्भुत लहरी
आपोआप साधी दुवा

रे करताना अशी सेवा
शिरकाव ना अहंभावा
ऋण जात धर्म लिंग
लांब ठेवावे भेद भावा

ऋण बरा होई तेधवा
जन्मजणूं मिळेलं नवा
सेवेकरी रे पडद्याआड
जशी अदृश्य दृश्य
हवा

- हेमंत मुसरीफ,
पुणे
९७३०३०६९९६

मुख्यमंत्री यांच्या संकल्पनेतून 'महाराष्ट्र पब्लिक रिलीफ सोसायटी'ची स्थापना

अक्षराज : प्रतिनिधी

दि.०३, मुंबई : राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि नैसर्गिक आपत्तीच्या काळात बाधित नागरिकांना मदत करण्याबरोबरच आर्थिकदृष्ट्या गरजू रुग्णांच्या उपचारांसाठी अधिक निधी उपलब्ध व्हावा, या उद्देशाने मुख्यमंत्री सहायता निधीला आता सामाजिक सहभागाचे बळ मिळणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून 'महाराष्ट्र पब्लिक रिलीफ सोसायटी'ची स्थापना करण्यात आली आहे. कंपन्या, संस्था, देणगीदार आणि इतर सामाजिक घटकांच्या सहभागातून अतिरिक्त निधी उभारून तो गरजू रुग्णांसह विविध आपत्तींत बाधित नागरिकांच्या मदतीसाठी वापरता येणार आहे. त्यामुळे महागड्या उपचारांची गरज असलेल्या रुग्णांना अधिक आर्थिक मदत देण्याबरोबरच दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती आणि अन्य आपत्कालीन परिस्थितीतही मदतीचा हात पुढे करता येणार आहे.

या नव्या व्यवस्थेमुळे हृदयरोग, कर्करोग, मूत्रपिंडविकार, मेंदूविकार यांसह विविध गंभीर आजारांवरील शस्त्रक्रिया, महागडे आणि दीर्घकालीन उपचारांसाठी अधिक मदत उपलब्ध करून देता येणार आहे. गरजेनुसार औषधे, वैद्यकीय साहित्य आणि उपचारासाठी आवश्यक इतर बाबींसाठीही मदत करता येणार आहे. दुर्मिळ आजारांवरील उपचारांसाठीही या माध्यमातून विशेष मदत उभारता येणार आहे.

मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाच्या आढावा बैठकीत रुग्णांच्या उपचारासाठी सामाजिक दायित्वातून अतिरिक्त निधी उभारण्याच्या पर्यायांचा अभ्यास करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते. त्यानुसार, 'महाराष्ट्र पब्लिक रिलीफ सोसायटी'ची स्थापना करण्यात आली. या माध्यमातून कंपन्या, संस्था आणि देणगीदारांच्या सहभागातून उभारलेला निधी गरजू रुग्णांच्या उपचारासाठी वापरता येणार आहे. रुग्णालये, स्वयंसेवी संस्था, कंपन्या आणि सामाजिक संस्थांना गरजेनुसार एकत्र आणून विविध वैद्यकीय मदतीचे उपक्रमही राबविता येणार आहेत. बाधित व्यक्ती आणि त्यांच्या कुटुंबीयांना मदत करता येणार आहे. गरीब नागरिकांना आवश्यक वस्तूंचे वितरण, दिव्यांगांसाठी काम करणाऱ्या संस्थांना सहाय्य आणि सामुदायिक आरोग्य शिबिरांचे आयोजनही करता येणार आहे. आरोग्य जनजागृती, चर्चासत्रे, कार्यशाळा आणि सार्वजनिक आरोग्याशी संबंधित उपक्रमांनाही या माध्यमातून मदत करता येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या नव्या व्यवस्थेमुळे गरजू रुग्ण आणि आपत्तीग्रस्त नागरिकांना मदतीचा आणखी एक आधार उपलब्ध होणार आहे. कंपन्या, संस्था आणि दानशूर व्यक्तींच्या लोकसहभागातून अधिकाधिक गरजूंपर्यंत मदत पोहोचविता येणार आहे.

वाचक पत्र

यांच्याकडूनही खरेदी करा !



दोन दिवसांवर दिवाळी येऊन ठेपल्यामुळे समस्त बाजारपेठा रंगीबेरंगी तोरणांनी, निरनिराळ्या कंदिलांनी, सजावटीच्या साहित्यांनी सजल्या आहेत. शहरासारख्या ठिकाणी दुकानांपेक्षा रस्त्यावरील विक्रेत्यांकडून सजावटीचे साहित्य खरेदी करण्यालाच लोक पसंती देताना दिसत आहेत. या विक्रेत्यांच्या गर्दीत कुठेतरी कोपऱ्याला मातीच्या पणत्या, लक्ष्मीपूजनाला पुजली जाणारी फुलझाडू, नरकचतुर्दशीला फोडले जाणारे कारेटे असे थोडे थोडके साहित्य विकणाऱ्या ७०-८० वयाच्या वयस्क बायका आणि पुरुष नक्कीच नजरेत पडतात. या वयातही त्यांची पोटासाठी मेहेनत करण्याची जिद्द पाहून कुणाच्याही डोळ्यात पाणी यावे. दिवसभर मेहेनत करून जेमतेम २००-३०० रुपयेही यांच्या पदरी पडत नसावेत. तरीही भीक मागण्यापेक्षा मेहनतीचे ४ पैसे कमवून कष्टाची भाकरी खाण्याची त्यांची वृत्ती बरेच काही शिकवून जाते. अशा वयस्कांकडून त्यांच्याकडील साहित्य अवश्य खरेदी करावे. त्यांनी थाटलेला छोटासा व्यवसाय त्यांना श्रीमंत बनवणारा नसला, तरी या धकाधकीच्या जीवनात त्यांना दोन वेळचे अन्न मिळवून देऊन जिवंत ठेवणारा नक्कीच असतो. अशांकडून खरेदी करताना भाव-तोल करू नका. त्यांनी सांगितलेल्या भावातच वस्तू खरेदी करा कारण आपण दिलेले अधिकचे २ रुपयेही त्यांना लाखमोलाची उभारी देत असतात.

- सौ. मोक्षदा घाणेकर
काळाचौकी, मुंबई

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज

थोडक्यात बातम्या

NCMC कार्ड नोंदणी शिबिराला दिव्यात उत्स्फूर्त प्रतिसाद; २५० हून अधिक नागरिकांनी घेतला लाभ



अक्षराज : विनोद वास्कर

दि.०३, पडले गांव (ठाणे) : ठाणे महानगरपालिकेचे नगरसेवक बाबाजी बाळाराम पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या छउचउ कार्ड नोंदणी शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. नुकतेच बी.के.फाउंडेशन च्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात सुमारे २००ते २५० नागरिकांनी सहभागी होत NCMC स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली.


महिला, १२ वर्षांवरील मुली आणि ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना एसटी प्रवासात ५०% सवलतीचा लाभ घेता यावा, या लोकहिताच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला होता.

नागरिकांनी दाखवलेला हा उत्स्फूर्त प्रतिसाद समाधान देणारा असून, सर्व नागरिकांनी दाखवलेल्या विश्वासाबद्दल आणि सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार, अशी प्रतिक्रिया नगरसेवक बाबाजी पाटील यांनी दिली.

यावेळी नगरसेवक बाबाजी पाटील, नगरसेविका अर्चना पाटील, टी.डी.सी.सी बँकेचे संचालक आकाश पाटील, ऍड सुवर्णा पावशे, नथुराम पाटील, बाबुराव म्हात्रे, कृष्णा ठाकूर, देविदास पाटील, विनायक पाटील, प्रताप पाटील, राजेश म्हात्रे यांच्यासह शिवसेनेचे अनेक पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

दिवा शहरात दिवाळीची खास भेट

महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत NCMC स्मार्ट कार्ड वाटप - नगरसेवक पाटील यांचा उपक्रम



अक्षराज विनोद वास्कर

दि.०३, दिवा (ठाणे) : महाराष्ट्र राज्य परिवहन म हामंडळ (एसटी) च्या प्रवाशांसाठी आधुनिक, सुरक्षित आणि सुलभ प्रवासासाठी असलेले RuPay NCMC स्मार्ट कार्ड आता दिवा शहरातील महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना पूर्णपणे मोफत मिळणार आहे. दिवाळी निमित्त दिवा शहराचे लोकप्रिय नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांच्यातर्फे हा विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे.

शिवसेना दिवा शहराच्या वतीने आयोजित या उपक्रम चा लाभ सर्व महिला व ज्येष्ठ नागरिकांना घेता येणार असून, या स्मार्ट कार्डचे १९९ रुपयांचे शुल्क पूर्णपणे माफ करण्यात आले आहे.

स्मार्ट कार्डचे फायदे :- १) एसटी प्रवासासाठी RuPay ON-THE-GO (NCMC) कार्ड म्हणून वापर. २) भविष्यात शहरातील बस, मेट्रो, पार्किंग सेवांसाठीही उपयुक्त. ३) सुरक्षित, रोखरहित आणि वेगवान व्यवहार. ४) UPI, नेट बँकिंग, मोबाईल ॲपद्वारे टॉप-अप सुविधा. ५) ३० दिवसांसाठी दीर्घकाळ वैधता.

कागदपत्रे आणि वेळ :- या कार्डसाठी फक्त मूळ आधार कार्ड आणि सक्रिय मोबाईल नंबर आवश्यक आहे.

रविवार, दि.०८ नोव्हेंबर २०२६ रोजी, वेळ : सकाळी ११ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत, स्थळ : सद्गुरु वाडी, दिवा स्टेशन, दिवा (पूर्व), या उपक्रमासाठी NSDL आणि Ebix CASH यांचे सहकार्य लाभले आहे. दिव्यातील जास्तीत जास्त महिला व ज्येष्ठ नागरिकांनी या मोफत सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन शैलेश पाटील नगरसेवक ठा.म.पा यांनी केले आहे.

पारशिवनी, कामठी तालुक्यात बिबट्याची दहशत संपली

बाराभाई (हिंगणा) व वाघोडा गावात परिसरात धुमाकूळ घालणारा बिबट्या अखेर जेरबंद



अक्षराज : दिवाकर घेर

दि.०३, नागपूर : मागील दोन दिवसांपासून बाराभाई (हिंगणा) व वाघोडा गावात दहशत माजवणारा बिबट्या अखेर मध्यरात्री वन विभागाच्या पिंजऱ्यात अडकला आहे. बिबट्याला जेरबंद करण्यात वन विभागाला मोठे यश आले असून परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निःश्वास टाकला आहे. दिनांक ०२ नोव्हेंबर रोजी बाराभाई (हिंगणा) व वाघोडा गावात बिबट्याने दोन वासरांची शिकार केली, शिवाय एका गाईला गंभीर जखमी केल्याने ग्राम स्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. ग्रामस्थांच्या मागणीनंतर आणि सुरक्षेचे गांभीर्य ओळखून पारशिवनी परिक्षेत्र वन विभागाने वाघोडा परिसरात तात्काळ सापळा रचून पिंजरा लावला.

दि.०३ नोव्हेंबर मंगळवारला मध्यरात्रीच्या सुमारास भक्ष्याच्या शोधात आलेला बिबट्या थेट पिंजऱ्यात अडकला. मंगळवारी सकाळी बिबट्या अडकल्याचे समजताच ग्रामस्थांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली होती.

या बिबट्याने गेली ३ -४ महिन्यापासून परिसरात मोठ्या प्रमाणात धुमाकूळ घातला होता. या दरम्यान अनेक गायी व वासरांची शिकार केलेली आहे.माहिती मिळताच पारशिवनी वन विभागाचे पथकाने घटनास्थळी जाऊन बिबट्याला सुरक्षितपणे ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी हलवण्यात आले आहे.

टाकळी ढोकेश्वरमध्ये घरफोडी करणारी जालना जिल्ह्यातील टोळी जेरबंद; तीन जण ताब्यात

जप्त मुद्देमालामध्ये ८ लाखांची कार, १ लाखांची मोटारसायकल आणि ८ लाख ४० हजार रुपये किमतीचे ६० ग्रॅम सोने यांचा समावेश



अक्षराज : वसंत रांधवण

दि.०३, पारनेर (अहिल्यानगर) : टाकळी ढोकेश्वर येथील खिलारी वस्तीवर घराचे कुलूप तोडून सोन्याचे दागिने चोरणाऱ्या जालना जिल्ह्यातील टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. या प्रकरणात पोलिसांनी तीन आरोपींना ताब्यात घेतले असून, गुन्ह्यात वापरलेली कार, मोटारसायकल आणि ६० ग्रॅम वजनाचे सोने असा एकूण १७ लाख ४० हजार रुपयांचा म ुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे पारनेर तालुक्यातील घरफोडीचा गुन्हा उघडकीस आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २५ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी सुमारे १.१० वाजता खिलारी वस्ती, टाकळी ढोकेश्वर येथील मंगल संतोष गोरडे यांच्या घराचे कुलूप तोडून अज्ञात तीन चोरट्यांनी ३ लाख ९ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले होते. याप्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी तपासासाठी पथक नियुक्त केले. गोपनीय माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास करताना हा गुन्हा जालना जिल्ह्यातील घनसांगवी येथील कार्तिक प्रकाश आव्हाड व त्याच्या साथीदारांनी केल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

चोरीसाठी कार आणि मोटारसायकलचा वापर

पोलिसांनी कार्तिक आव्हाड (वय २०), गणेश प्रकाश आव्हाड (वय २०), अभिषेक उर्फ अभि प्रकाश लोमटे (वय २१) या तिघांना ताब्यात घेतले. तपासात कार आणि मोटारसायकलचा वापर करून चोरी केल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणातील अर्जुन गणपत गायकवाड, पूजा प्रकाश आव्हाड आणि सुमित विनायक पांगजे हे अद्याप फरार असल्याचे पोलिसांनी सांगितले. जप्त मुद्देमालामध्ये ८ लाखांची कार, १ लाखांची मोटारसायकल आणि ८ लाख ४० हजार रुपये किमतीचे ६० ग्रॅम सोने यांचा समावेश आहे. ताब्यातील आरोपींना मुद्देमालासह पारनेर पोलिस ठाण्यात हजर करण्यात आले असून पुढील तपास पारनेर पोलिस करीत आहेत. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदारांनी केली.

कमी पाऊस, वाढते तापमान यामुळे राज्यात विजेची मागणी वाढली

महानिर्मितीची सलग ५ महिने उच्चांकी वीज निर्मिती



अक्षराज : दिवाकर घेर

दि.०३, नागपूर : जून २०२६ ते ऑक्टोबर २०२६ दरम्यान सलग ५ महिने उच्चांकी वीज निर्मिती करून महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीने (महानिर्मिती) औष्णिक वीज निर्मितीसह एकूण मासिक वीज निर्मितीमध्ये नवा इतिहास रचला आहे.

राज्यात पडलेला कमी पाऊस, वाढते तापमान यामुळे विजेची वाढती मागणी लक्षात घेता नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे हा ऐतिहासिक विक्रम शक्य झाला आहे. औष्णिक, जल, वायू व सौर वीज केंद्राच्या अधिकारी, अभियंता, तंत्रज्ञ व कर्मचाऱ्यांच्या टीम वर्कचा हा परिपाक आहे. केलेले नियोजन, कार्यक्षमता वाढवण्यासाठी घेतलेले परिश्रम व मार्गदर्शन यामुळेच हा विक्रम शक्य झाला आहे. हा केवळ आकड्यांचा विक्रम नसून, महाराष्ट्राच्या विकासाला दिलेली ऊर्जे ची शक्ती आहे.

जून २०२६ मध्ये औष्णिक वीज निर्मिती ४,८५० दशलक्ष युनिट्स तर एकूण मासिक वीज निर्मिती ५,१५९ दशलक्ष युनिट्स झाली. जुलै २०२६ मध्ये औष्णिक ४,४३६ दशलक्ष युनिट्स व एकूण ४,८५८ दशलक्ष युनिट्स, तर ऑगस्ट २०२६ मध्ये औष्णिक ४,६५६ दशलक्ष युनिट्स व एकूण ५,२०९ दशलक्ष युनिट्स निर्मिती झाली.

सप्टेंबर २०२६ मध्ये औष्णिक वीज निर्मिती ४,६१५ दशलक्ष युनिट्स व एकूण मासिक निर्मिती ५,२७९ दशलक्ष युनिट्स नोंदवली गेली. त्यानंतर ऑक्टोबर २०२६ मध्ये औष्णिक वीज निर्मिती ५,१५९ दशलक्ष युनिट्सवर पोहोचली, तर एकूण मासिक वीज निर्मिती ५,८१७ दशलक्ष युनिट्सचा टप्पा गाठून नवीन सर्वकालीन उच्चांक स्थापित झाला. यापूर्वी ऑक्टोबर महिन्यात सर्वोच्च वीज निर्मिती २०२३ मध्ये झाली होती, ज्याचा पूर्वीचा उच्चांक ५,३४२ दशलक्ष युनिट्स इतका होता.

सणासुदीचा काळ, भविष्यातील वाढती विजेची मागणी यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी महानिर्मितीने सर्वकप नियोजन केले असून, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी. यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच संचालक अभय हरणे यांच्या नेतृत्वामध्ये एका विशेष तज्ञ गटाची स्थापना करण्यात आली आहे. या उच्चांकी कामगिरीत महानिर्मितीच्या नवीकरणीय ऊर्जा निर्मितीचाही अत्यंत महत्त्वाचा वाटा राहिला असून, नजीकच्या भविष्यात आणखी अनेक नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प वेगाने कार्यान्वित केले जात आहेत.

या उच्चांकी वीज उत्पादनासाठी अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी. व म हानिर्मितीचे सर्व संचालक अभय हरणे, राजेश पाटील, विजय राठोड यांनी महानिर्मितीच्या सर्व अधिकारी, अभियंता, कामगार व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे. महाराष्ट्रात अभूतपूर्व दुष्काळाची परिस्थिती असताना महानिर्मिती उच्चांकी वीज निर्मिती करीत आहे ही निश्चितच अभिमानाची बाब आहे, असे मत अधिकाऱ्यांनी व्यक्त केले.

मिरा-भाईंदरमध्ये भाजपचा पुन्हा एकदा सत्ताधाऱ्यांसारखा 'हुकूमशाही' अवतार

लोकशाहीचा गळा घोटणाऱ्या भाजपला शिवसेना महिला आघाडीने दाखवला 'आरसा'



अक्षराज : घनश्याम आंबोकर

दि.०३, मिरा-भाईंदर : मिरा-भाईंदर शहराला आपल्या भ्रष्टाचाराच्या विळख्यात ओढणाऱ्या आणि शहराची राखरांगोळी करू पाहणाऱ्या स्थानिक भाजप नेत्यांचा आणि सत्ताधारी पक्षाचा खरा चेहरा आज पुन्हा एकदा वेशीवर टांगला गेला आहे. सर्वसाम न्यांच्या हितासाठी अहोरात्र धावून जाणारे कार्यसम्राट नेते महाराष्ट्र राज्य परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्हा पालकमंत्री आणि मिरा-भाईंदर शहराचे लोकप्रतिनिधी प्रताप इंदिराबाई बाबुराव सरनाईक यांच्याविरोधात बिनबुडाचे राजकारण करत भाजप पदाधिकाऱ्यांनी रचलेल्या सोंग आंदोलनाचा बुरखा आज शिवसेना महिला आघाडीने अत्यंत सनदशीर मार्गाने फाडला. दुसऱ्यांवर बोट दाखवण्यापूर्वी स्वतःचे भ्रष्ट प्रतिबिंब पहा! या स्पष्ट संदेशासह शिवसेना म हिला आघाडीच्या वतीने भाजप नेत्यांना आंदोलनादरम्यान आरसे दाखवण्यात आले. मात्र, सत्य पचवणे कठीण झालेल्या आणि स्वतःच्या भ्रष्टाचाराची लाज वाटणाऱ्या भाजपच्या दबावाखाली आज स्थानिक पोलिसांनी लोकशाहीचा थेट गळा घोटण्याचे निर्लज्ज कृत्य केले आहे.

*** खाकीचा धाक की भाजपच्या दबावाखालील दडपशाही?**

लोकशाही मार्गाने शांततेत आरसा दाखवणाऱ्या शिवसेना महिला आघाडीच्या रणरागिणींवर नवघर पोलिसांनी ज्या प्रकारे बळाचा वापर केला, तो अत्यंत संतापजनक आणि संविधानाला काळिमा फासणारा आहे. पोलिसांकडून महिला पदाधिकाऱ्यांना धक्काबुक्की करत, काठ्या मारत अत्यंत अमानुषपणे पोलीस व्हॅनमध्ये कोंबण्यात आले आणि त्यांना बेकायदेशीरपणे ताब्यात घेण्यात आले. सत्ताधारी भाजपच्या नाकर्तेपणाचा आणि भ्रष्टाचाराचा बुरखा टप्प्याटप्प्याने फाटत असल्याने भयभीत झालेल्या भाजप नेत्यांनी पोलिसांना पुढे करून हा लोकशाहीचा आवाज दडपण्याचा नीच प्रयत्न केला आहे.

*** शिवसेना जिल्हा संघटक निशा नार्वेकर यांच्यासह महिला पदाधिकाऱ्यांना बेकायदेशीर अटक**

शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हा संघटक निशा नार्वेकर यांच्यासह सर्व प्रमुख शिवसैनिक महिला पदाधिकाऱ्यांना नवघर पोलिसांनी जबरदस्तीने ताब्यात घेतले. या दडपशाही विरोधात आणि पोलीस प्रशासनाच्या या एकतर्फी, पक्षपाती भूमिकेच्या निषेधार्थ सर्व महिला शिवसैनिकांनी नवघर पोलीस ठाण्याबाहेर एकत्र येत जोरदार 'ठिय्या आंदोलन' पुकारले.

यासंपूर्ण प्रकरणावर आपली प्रतिक्रिया देत मिरा-भाईंदर शिवसेना जिल्हा संघटक निशा नार्वेकर म्हणाल्या कि, ज्या भाजप नेत्यांनी मिरा-भाईंदर शहरात भस्मासुरासारखा भ्रष्टाचार करून संपूर्ण शहर गिळण्याचा प्रयत्न केला, तेच आज स्वतःचा नाकर्तेपणा लपवण्यासाठी दुसऱ्यांवर बोट दाखवत आहेत. आमच्या कार्यसम्राट नेत्यांवर बोट उचलण्यापूर्वी स्वतःच्या काळ्या तोंडावर आरसा लावून बघा. पोलिसांच्या काठ्या आणि व्हॅनच्या जोरावर शिवसेनेचा आवाज दाबण्याचे स्वप्न भाजपने पाहू नये. आज आम्हाला काठ्यांनी मारून आणि व्हॅनमध्ये कोंबून आमचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला गेला असेल, तर कान उघडून ऐका.. शिवसेना ही बाळासाहेब ठाकरेंच्या विचारांची आणि संघर्षातून निर्माण झालेली संघटना आहे आणि आम्ही आदरणीय हिंदूहृदयसम्राट बाळासाहेबांच्या आणि धर्मवीर आनंद दिघे साहेबांच्या विचारांवर चालणाऱ्या शिवसेनेच्या रणरागिणी आहोत. तुमच्या प्रत्येक भ्रष्ट कृत्याला आणि लाचारी करणाऱ्या पोलिसांना गुडघे टेकवायला भाग पडल्याशिवाय गप्प बसणार नाही. शिवसेना आपल्या शैलीत चोख उत्तर देईल.

पनवेल मनपाच्यावतीने दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर दिवाळी निमित्त होणारी विद्युत रोषणाई रद्द

अक्षराज : जे.के.पोळ

दि.०३, पनवेल : म हानगरपालिकेच्या वतीने यावर्षी दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर दिवाळी निमित्त चारही प्रभागात करण्यात येणारी विद्युत रोषणाई रद्द करण्यात आली आहे.

दरवर्षी महापालिकेच्यावतीने म हापालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विद्युत रोषणाई केली जाते. परंतू अल निनोच्या प्रभावामुळे महाराष्ट्रात यावर्षी दुष्काळाचे सावट गडद झाले आहे.

या पार्श्वभूमीवर महापौर नितीन पाटील, सभागृह नेते प्रकाश बिनेदार व आयुक्त मंगेश चितळे यांनी नुकत्याच झालेल्या बैठकित म हापालिकेच्यावतीने दिवाळी निमित्त चारही प्रभागात करण्यात येणारी विद्युत रोषणाई रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

डहाणूतील जमीन प्रश्नांवर आमदार विनोद निकोले यांचा मंत्रालयात आवाज; महसूलमंत्र्यांसोबत महत्त्वपूर्ण बैठक

अक्षराज : निलेश कासट

दि.०३, डहाणू (पालघर) : डहाणू विधानसभा मतदारसंघासह संपूर्ण महाराष्ट्रातील आदिवासी बांधव, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रलंबित जमीन व महसूलविषयक प्रश्नांना न्याय मिळावा, यासाठी आम दार कॉ.विनोद निकोले यांनी महसूल विभागाकडे पाठपुरावा सुरू ठेवला आहे. याच अनुषंगाने दिनांक ०३ नोव्हेंबर २०२६ रोजी महाराष्ट्र राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत डहाणू विधानसभा मतदारसंघातील तसेच राज्यातील विविध महसूलविषयक प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.



या बैठकीला डहाणू विधानसभा म तदारसंघाचे आमदार कॉ. विनोद निकोले उपस्थित होते. त्यांनी मतदारसंघातील आदिवासी आणि शेतकरी बांधवांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या जमिनींच्या प्रश्नांकडे महसूलमंत्र्यांचे लक्ष वेधले. यामध्ये वनजमिनी, वरकस जमि नी, तळघराजवळील जमिनी, गावठाण विस्तार, देवस्थान जमिनी आणि गायरान जमिनींसंदर्भातील विविध अडचणी म ांडण्यात आल्या.

वर्षानुवर्षे जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर भर

आदिवासी व शेतकरी बांधव अनेक वर्षांपासून कसत असलेल्या जमिनींच्या हक्कांचे प्रश्न अद्याप ही प्रलंबित आहेत. जमिनींच्या नोंदी, महसूल दप्तरातील त्रुटी, मालकी हक्कासंबंधी अडचणी आणि विविध शासकीय प्रक्रियांमुळे नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या प्रश्नांची सोडवणूक करून संबंधितांना न्याय मिळावा, अशी भूमिका आमदार निकोले यांनी बैठकीत मांडली.

तसेच ग्रामीण भागातील वाढती लोकसंख्या आणि कुटुंबांची संख्या लक्षात घेता गावठाण विस्ताराचा प्रश्नही महत्त्वाचा असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. गावठाण विस्ताराच्या म ाध्यमातून घरांसाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली.

दुष्काळामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना शासकीय मदत मिळण्याच्या प्रक्रियेत पंचनाम्यांचा प्रश्नही बैठकीत उपस्थित करण्यात आला. तांत्रिक अडचणी किंवा अन्य कारणांमुळे ज्या शेतकऱ्यांचे पंचनामे ऑनलाइन पद्धतीने होऊ शकले नाहीत, अशा शेतकऱ्यांचे नुकसान दुर्लक्षित राहू नये, यासाठी ऑफलाइन पद्धतीने पंचनामे करण्याची कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी यावेळी मांडण्यात आली. त्यामुळे मदतीपासून वंचित राहण्याची शक्यता असलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याच्या दृष्टीने हा मुद्दा महत्त्वपूर्ण ठरला.

थोडक्यात बातम्या

शिवनेरी गुरुकुलमध्ये दीपावली स्नेहबंध कार्यक्रम संपन्न

अक्षराज : बालासाहेब फुलपगार

दि.०३, पालम (परभणी) : पालम येथील शिवनेरी गुरुकुलमध्ये शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व सेवक यांच्यातील स्नेहबंध अधिक दृढ व्हावे.परस्परांतील जिव्हाळा आणि ऋणानुबंध कायम राहावेत, या उद्देशाने 'दीपावली स्नेहबंध' कार्यक्रमाचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. दीपावलीच्या पार्श्वभूमीवर आयोजित या कार्यक्रमामुळे गुरुकुल परिसरात आनंदाचे आणि आपुलकीचे वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अभिनव शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ.एस.व्ही.शेटे होते. यावेळी सचिव वैभव शेटे, शिक्षण विस्तार अधिकारी सुभाष चव्हाण, प्रा.डी.आर. तोंडारे, प्रा.आर. सी.घोगरे, पत्रकार चांद तांबोळी, गुणवंत सराफ, बालासाहेब फुलपगार, गोविंद सोलेवाड यांच्यासह शिवनेरी गुरुकुलमधील मान्यवर, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. संस्थापक अध्यक्ष प्रा.एस.व्ही.शेटे यांनी उपस्थितांशी संवाद साधत मनोगत व्यक्त केले. संस्थेच्या जडणघडणीत शिक्षक, प्राध्यापक, कर्मचारी व सेवक यांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे नमूद करत त्यांनी सर्वांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.



संस्थेतील प्रत्येक घटकासोबत असलेले स्नेहाचे आणि जिव्हाळ्याचे नाते भविष्यातही असेच दृढ राहावे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. तसेच सर्वांनी दीपावलीचा आनंद, उत्साह आणि सकारात्मक ऊर्जा एकमेकांसोबत वाटून घ्यावी, अशा शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शिवनेरी गुरुकुलमधील शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व सेवकांचा सन्मान करण्यात आला. दीपावलीच्या निमित्ताने सर्वांना शुभेच्छा देत संस्थेच्या वतीने दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. स्नेह, आपुलकी आणि परस्पर सहकार्याची भावना वृद्धिंगत करणारा हा उपक्रम उपस्थितांसाठी आनंददायी ठरला. कार्यक्रमादरम्यान संस्थेच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा गौरव करण्यात आला. दीपावली हा केवळ प्रकाशाचा सण नसून माणसामाणसांमधील प्रेम, आपुलकी, विश्वास आणि बंधुभाव वाढविण्याचा सण असल्याचे उपस्थित मान्यवरांनी नमूद केले. अशा स्नेहमेळाव्यांमुळे संस्थेतील वातावरण अधिक सकारात्मक व कौटुंबिक होण्यास मदत होते, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.याप्रसंगी एच.डी. शेटे, दुधाटे, चौकाले यांच्यासह शिवनेरी गुरुकुलमधील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व सेवक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बापू सोनटक्के यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. राहुल गायकवाड यांनी केले. स्नेह, कृतज्ञता आणि दीपावलीच्या आनंदाने भारलेल्या वातावरणात राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

पनवेल मनपाच्या विशेष सर्वसाधारण सभेत चर्चेसह विविध विषयांना मंजूरी

अक्षराज : जे.के.पोळ

दि.०३, पनवेल : म हानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा क्र.१३, आज मंगळवार, दिनांक ३ नोव्हेंबर रोजी आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे आयोजित करण्यात आली. महापौर नितीन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ही सर्वसाधारण सभा घेण्यात आली. या सर्वसाधारण सभेत विविध विषयांवर चर्चा करून विषय मंजूर करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर आयुक्त मंगेश चितळे, उपमहापौर प्रमिला पाटील, अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, उपसचिव अक्षय कदम उपस्थित होते.पनवेल महानगरपालिका हद्दीतील सिडको प्राधिकरणामार्फत हस्तांतरीत आरक्षित शाळेकरीता खेळाचे मैदान लगतच्या शाळांना भाडेतत्वावर देणेबाबतचा विषय विशेष सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आला.पनवेल म हानगरपालिका क्षेत्रातील अनाथ व निराधार किंवा दोन्ही पालक गमावलेले गुणवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रोत्साहन देण्यासाठी अनाथ बाल शिक्षण शिष्यवृत्ती योजना सुरु करण्याबाबतचा विषय विशेष सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आला.पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती क, प्रभाग क्र.१४ मधील पनवेल रेक्लमेशन मैदानातील कब्रस्थान भोवती भिंत उभारणेचा विषय विशेष सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आला. पनवेल तालुक्यातील गव्हाण व वडघर हे जिल्हा परिषद गट पनवेल महानगरपालिकेमध्ये समाविष्ट करणेबाबतचा विषय विशेष सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आला. पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती अ, ब, क व ड अंतर्गत रस्ते दुरुस्ती व इतर विकासकामांमध्ये वापरण्यात आलेल्या डांबर (इर्ळीशप) दरवाढीपोटी संबंधित कंत्राटदारांना वाढीव दराचा फरक अदा करण्यास धोरणात्म क निर्णय घेणेबाबतचा विषय विशेष सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आला.



वंचित बहुजन आघाडीचा 'गाव तिथे शाखा' अभियान राबविण्याचा निर्धार

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक बांधणीचा आढावा; जनसंपर्क मोहीम प्रभावी करण्यावर भर

अक्षराज : दिवाकर घेर

दि.०३, नागपूर : आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीने नागपूर जिल्ह्यात संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी 'गाव तिथे शाखा' अभियान राबविण्याचा निर्धार केला आहे. यासंदर्भात पक्षाच्या नागपूर जिल्हा कार्यकारिणी, महिला आघाडी आणि युवा आघाडीच्या प्रम ुख पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक खापरखेडा पार पडली.

नागपूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष अजय सहारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष महानंदा राऊत, युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष अनिरुद्ध मडके आणि महासचिव सी.सी. वासे यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीत आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने पक्षाच्या संघटनात्मक तयारीचा आढावा घेण्यात आला. गावपातळीवर पक्षाचे संघटन मजबूत करणे, नवीन कार्यकर्त्यांना पक्षाशी जोडणे आणि विविध भागांत पक्षाचा विस्तार करण्याबाबत चर्चा करण्यात आली.'गाव तिथे शाखा' अभियानासोबतच जनसंपर्क मोहीम प्रभावीपणे राबविण्याचे नियोजन करण्यात आले.

तळागाळातील कार्यकर्त्यांशी संपर्क वाढवून गावपातळीवर संघटनात्मक जाळे मजबूत करण्यावर यावेळी विशेष भर देण्यात आला. संघटनेची ताकद वाढविण्यासाठी नियोजनबद्ध कार्यक्रम आखून सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करण्याचा निर्धार बैठकीत व्यक्त केला. आगामी निवडणुकांच्या दृष्टीने पक्षाची संघटनात्म क तयारी अधिक व्यापक करण्यावरही चर्चा झाली. या बैठकीला विजय बागडे, वैभव येवले, शुभम वाहाणे, धनेश्वर ढोके, राजू बागडे, रोशन सोमकुवर, ॲड. संजय गणवीर, छाया सहारे, कविता मेश्राम, बालिता चिमणकर, पूनम बोरकर, शांताराम ढोके, राजहंस मारबते, अरुण गजभिये, भीमराव सोमकुवर, वसंत मडके, मिलिंद पकीड्डे, सुषमा निम सरकार, लता म्हैसकर, सरिता दिवे, रेखा बोरकर, मिथुन सहारे, अनिल नांदूरकर, राजेंद्र वासनिक आणि माधुकर बोरकर यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



मैत्रिणीच्या भेटीचा बेत आखला...पोलिसांनी डाव साधला; तडीपार व एमपीडीए आरोपीची धरपकड

अक्षराज : प्रणिल कुसाळे

दि.०३, येरवडा (पुणे) : मैत्रिणीला भेटण्यासाठी येरवड्यात आलेल्या तडीपार व एमपीडीए आरोपीला लक्ष्मीनगर पोलिसांनी सापळा रचून ताब्यात घेतले. निखिल मधुकर कांबळे (वय २२) असे पकडण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, एमपीडीए कारवाईच्या अनुषंगाने पुढील कार्यवाहीसाठी त्याला खराडी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.



लक्ष्मीनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात असून पोलीस अंमलदार राहुल परदेशी, अक्षय शिंदे आणि पोलीस हवालदार किरण भागीत यांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, तडीपार आरोपी निखिल कांबळे हा येरवडा येथील सरगम जवळील गाडीतळ परिसरात मैत्रिणीला भेटण्यासाठी येणार आहे.

या माहितीच्या आधारे पोलिसांनी परिसरात सापळा रचला. आरोपी तेथे येताच पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्यानंतर लक्ष्मीनगर पोलीस ठाण्यात आणून त्याच्या गुन्हेगारी अभिलेखांची पडताळणी करण्यात आली. पुढील एम पीडीए कारवाईसाठी आरोपीला खराडी पोलिसांकडे सुपूर्द करण्यात आले.

सदर कारवाई लक्ष्मीनगर पोलिस स्टेशनचे वपोनि युवराज नांद्रे, पो. नि. (गुन्हे अमर कदम, पोनि. (गुन्हे दिलीपकुमार वेडे,) फक्तचे अधिकारी, सपोनि निखिल पवार, सपोनि दत्तात्रय लिगाडे, पो. हवा. मयुर सुर्यवंशी, पो. हवा. गणेश लोखंडे, पो.हवा. किरण भागीत, पो. हवा श्रीनाथ कांबळे, पो. अंमलदार राहुल विदेशी, अक्षय ऊर्जा, सुरज ओंवासे, मराव कांबळे, अमोल वायळ, राजकारणी धायगुडे, कादिर शेख, दत्तात्रय विकास, सचिन कुचेकर यांनी हे मान्य केले आहे.

चंद्रपूरच्या वाहतूक व्यवस्थेचा कणा असलेल्या होमगार्ड जवानांची चौकाचौकांत पुनर्नियुक्ती करा - आ.मुनगंटीवार

अक्षराज : वसंत वडस्कर

दि.०२, चंद्रपूर : शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यात आणि नागरिकांचा प्रवास सुरक्षित करण्यात होमगार्ड जवानांची भूमिका अत्यंत मोलाची आहे. शहरातील प्रमुख चौकांमध्ये वाहतुकीचे नियमन, वाहनांची शिस्त राखणे, वाहतूक कोंडी टाळणे आणि पादचाऱ्यांना सुरक्षितपणे रस्ता ओलांडण्यास मदत करणे, अशा अनेक महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या होमगार्ड जवान प्रामाणिकपणे पार पाडत असतात. त्यांच्या उपस्थितीमुळे वाहतुकीला शिस्त लागते आणि नागरिकांनाही मोठा दिलासा मिळतो. त्यामुळे चंद्रपूर महानगरातील वाहतूक व्यवस्था अधिक सुरक्षित, शिस्तबद्ध आणि सुरळीत ठेवण्यासाठी प्रमुख चौकांमध्ये होमगार्ड जवानांची आवश्यकता अनन्यसाधारण असून, त्यांची पूर्वीप्रमाणे तात्काळ पुनर्नियुक्ती करावी, अशी मागणी आ.सुधीर म ुनगंटीवार यांनी चंद्रपूरचे जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.



आ. सुधीर मुनगंटीवार यांनी पत्रात नमूद केल्यानुसार, चंद्रपूर महानगरातील प्रमुख चौकांमध्ये वाहतूक व्यवस्था सुरळीत राहावी आणि वाहनांची कोंडी होऊ नये, या उद्देशाने यापूर्वी होमगार्ड जवानांची वाहतूक नियंत्रणासाठी नियुक्ती करण्यात आली होती. त्यांच्या नियोजनबद्ध उपस्थितीमुळे शहरातील वाहतूक व्यवस्थेला शिस्त प्राप्त झाली होती. मात्र, मागील काही दिवसांपासून शहरातील विविध चौकांमध्ये नियुक्त करण्यात आलेले होमगार्ड जवान कर्तव्यावर दिसून येत नसल्याने वाहतूक नियंत्रणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. परिणामी, प्रमुख चौकांमध्ये वाहतुकीची अस्ताव्यस्त परिस्थिती निर्माण होत असून वाहनचालकांसह पादचाऱ्यांनाही गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. वाहतूक कोंडीमुळे अपघातांची शक्यताही नाकारता येत नाही. होमगार्ड जवान हे केवळ वाहतुकीचे नियमन करणारे कर्मचारी नसून, शहराच्या दैनंदिन सार्वजनिक व्यवस्थेतील एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहेत.

उन्हाची तीव्रता असो अथवा पावसाचा मारा, रस्त्यांवरील वाढती वाहनांची वर्दळ असो किंवा सण-उत्सवांच्या काळातील गर्दी, अशा प्रत्येक परिस्थितीत हे जवान कर्तव्य बजावत असतात. त्यांच्या दक्षतेमुळे वाहतुकीला दिशा मिळते, नागरिकांचा वेळ वाचतो आणि रस्त्यांवरील सुरक्षिततेला बळ मिळते. त्यामुळे त्यांच्या सेवेचे महत्त्व लक्षात घेऊन शहरातील वाहतूक नियंत्रणासाठी त्यांची नियमित उपस्थिती सुनिश्चित करणे आवश्यक असल्याचे आ.मुनगंटीवार यांनी अधोरेखित केले आहे.

या पार्श्वभूमीवर आ. सुधीर म ुनगंटीवार यांनी चंद्रपूरचे जिल्हा पोलीस अधीक्षक यांना पत्र लिहून चंद्रपूर महानगरातील सर्व प्रमुख चौकांमध्ये होमगार्ड जवानांची पूर्वीप्रमाणे तात्काळ पुनर्नियुक्ती करण्याची मागणी केली आहे. त्यांच्या माध्यमातून नियमितपणे वाहतूक संचालनाचे काम व्हावे आणि शहरातील वाहतूक व्यवस्था शिस्तबद्ध राहावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.शहराच्या सुरक्षिततेसाठी होमगार्ड जवानांचे योगदान अनिवार्य आहे. त्यांच्या कर्तव्यदक्ष सेवेचा योग्य उपयोग करून घेणे ही प्रशासनाचीही जबाबदारी आहे. त्यामुळे या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित विभागाने तातडीने कार्यवाही करावी, असे आवाहन आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केले आहे.

सरदार पटेल महाविद्यालयात 'विकसित भारत युवा संवाद' आणि 'नो युवर व्होट' कार्यक्रमाचे आयोजन

अक्षराज : वसंत वडस्कर

दि.०३, चंद्रपूर : केंद्र सरकारच्या युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालयांतर्गत कार्यरत 'मेरा युवा भारत' (माय भारत), चंद्रपूर आणि सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर यांच्या राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) विभागाच्या संयुक्त विद्यम ाने आज दि. ०२ नोव्हेंबर २०२६ रोजी सरदार पटेल महाविद्यालयात 'विकसित भारत युवा संवाद' आणि 'नो युवर व्होट' (नो युवर व्होट) या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात नागपूर येथील युथ आयकॉन अमन भांडारकर यांनी 'नो युवर व्होट' (आपले मत जाणा) या विषयावर विशेष सादरीकरण केले. त्यांनी आपल्या सादरीकरणातून लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानाचे महत्त्व, नवमतदारांची भूमिका आणि निवडणूक प्रक्रियेतील तरुणांचा सक्रिय सहभाग यावर सविस्तर मार्गदर्शन केले. तरुणांनी केवळ मतदार न राहता जागरूक नागरिक म्हणून लोकशाही प्रक्रियेत कसे योगदान द्यावे, याबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केले. याच कार्यक्रमात 'मेरा युवा भारत' चंद्रपूरचे जिल्हा युवा अधिकारी सारंग मेश्राम यांनी 'विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग २०२७' या राष्ट्रीय उपक्रमावर सादरीकरण केले. 'विकसित भारत २०४७' चे ध्येय साकारण्यासाठी तरुणांना नेतृत्व आणि नवकल्पना मांडण्याची संधी देणाऱ्या या अभियानाची सविस्तर माहिती त्यांनी दिली. माय भारत पोर्टलवरील नोंदणी प्रक्रिया, विविध स्पर्धांचे टप्पे आणि राष्ट्रीय स्तरावर चंद्रपूर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी याबद्दल त्यांनी महाविद्यालयीन तरुणांना माहिती देत या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले. या प्रसंगी सरदार पटेल महाविद्यालयाचे प्राध्यापक वृंद, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात हा संवाद सोहळा यशस्वीरीत्या पार पडला.

